जा.क्र.वलेप/उशि/औवि/लेप/२०२१/ 137–39
कार्यालय,वरीष्ठ लेखा परिक्षक (उशि)
औरंगाबाद विभाग औरंगाबाद.
दिनांक : - २४/०५/२०२१

प्रति,
**मा.प्राचार्य,**
ॲडो.बी.डी.हंबर्डे,महाविद्यालय,आष्टी,
ता. आष्टी जि. बीड.

**विषय :- सन (२०१४-१५ ते २०१९-२० ) चे लेखा परिक्षण/निरिक्षण अहवाल**

**महोदय,**

आपल्या महाविद्यालयाचे सन **(२०१४-१५ ते २०१९-२० )** या वर्षाचे निरिक्षण /लेखा परिक्षणाचा अहवाल सोबत पाठविला आहे.

आक्षेपाप्रमाणे अनुपालन कार्यवाही पूर्ण करुन तीस (३०) दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

कृपया या पत्राची पोहोच द्यावी.

**वरीष्ठ लेखा परिक्षक तथा लेखाधिकारी**
**उच्च शिक्षण अनुदान**
**औरंगाबाद.**

**प्रतिलिपी :** - १) सहायक संचालक (लेखा) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण ) म.रा.पुणे :-१ यांना सविनय सादर.

२) मा.सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना सोबतच्या लेखा परिक्षण अहवालात दर्शविल्याप्रमाणे वसूलीची रक्कम (रिकव्हरी)या पुढे देय होणा-या वेतन/वेतनेत्तर अनुदानातून वसूल करुन तसा अहवाल कार्यालयास पाठवावा,हि विनंती.

**वरीष्ठ लेखा परीक्षक तथा लेखाधिकारी**
**उच्च शिक्षण अनुदान**
**औरंगाबाद.**

श्रीमती जाधव
पत्राप्रमाणे अनुपालन अहवाल
तयार करुन सादर करणे.
25.05.2021

I.No. 05
25.5.2021

Principal
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya
Ashti, Tal. Ashti, Dist. Beed

**महाविद्यालय :-** ॲडो.बी.डी.हंबर्डे,महाविद्यालय,आष्टी,

**लेखा परीक्षण अहवाल सन :** सन २०१४-१५ ते २०१९-२०

कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय आष्टी जि. बीड,यांचे लेखा परीक्षण वरीष्ठ लेखा परीक्षक/ लेखा अधिकारी ,उच्च शिक्षण औरंगाबाद यांनी महाविद्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन केले व अहवाल बाबतची चर्चा प्राचार्य यांचेशी केली.

१) मा.सहसंचालक, उच्चशिक्षण,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे सन २०१४-२०१५ ते २०१७-१८ पर्यंतचा अनुदान निर्धारण अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. सन २०१८-१९ ते २०१९-२० पर्यतचे अहवाल अनुपालनास सादर करावेत.

**भाग : - २) चालु लेखा परीक्षण**

महाविद्यालयाचे प्राचार्य खालील प्रमाणे अधिकार पदावर कार्यरत होते.

| **अ. क्र** | **प्राचा-यांचे नाव** | **कालावधी** |
|---|---|---|
| **१** | **प्राचार्य डॉ. निंबोरे एस. आर.** | **दिनांक १२.११.२००७ ते आजपर्यंत.** |

**परि. क्र.- १ वेतन व वेतनेत्तर अनुदान**

१.महाविद्यालयास खालील प्रमाणे वेतन व वेतनेत्तर अनुदान मिळाल्याचे सादर केलेल्या लेख्यावरुन व सनदी लेखा परीक्षकांचे अहवालावरून दिसुन आले. परंतु कोणत्या आदेशान्वये प्राप्त झाले या बाबतचा पत्रव्यवहार / आदेश तपासणीस प्राप्त झाले नाही तरी पुढील लेखा परीक्षणात अनुपालन सादर करुन पुर्तता दर्शवावी.

| वर्ष | वेतन अनुदान | शैक्षणिक शुल्क | प्रत्यक्ष वेतन खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | -- | -- | -- | २९७९१७८ |
| २०१४-१५ | २०००८०९३ | २०४४०६ | २०२११८४८ | ६५१ |
| २०१५-१६ | २५३८४९७७ | २०५६०० | २५०२१३१४ | ५६९२६३ |
| २०१६-१७ | २५४१५८२० | २६२४०० | २५५६३०४० | ११५१८० |
| २०१७-१८ | २३८४२४०६ | ५८८८०० | २३८४१४२१ | ५८९७८५ |
| २०१८-१९ | २९०८३५८८ | ६१२८०० | २९०८२५८२ | ६१३८०६ |
| २०१९-२० | २८८०९४५९ | ५५२००० | २८७२८४८० | ६३२९७९ |
| एकूण | १५२५४४३४३ | २४२६००६ | १५२४४८६८५ | ५५००८४२ |

३१ मार्च २०२० अखेर वेतन खाती अनुदानातील शिल्लक रु. ५५००८४२/- आहेत. सन २०२०-२१ साठी वेतन अनुदानाची मागणी करतांना सदर शिल्लक अनुदान वगळून करण्यात यावी.

**परि.क्र २ :- किरकोळ रजेबाबत.**

महाविद्यालयीन प्राध्यापकांना नियमाप्रमाणे किरकोळ रजा वर्षभरात आठ अनुज्ञेय आहेत.यापेक्षा अधिक किरकोळ रजा उपभोगलेल्या अध्यापकांचा तपशिल अनुदान निर्धारण अहवालात आलेला आहे.त्याप्रमाणे त्यांची वसूली नियमाप्रमाणे करण्यात यावी.

**परि.क्र ३ :- सेवापुस्तीकेबाबतः-**

महाविद्यालयामध्ये शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे सेवापुस्तक आहेत. परंतु वेळोवेळी त्यात खालील प्रमाणे नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

१. काही कर्मचारी यांचे जन्म दिनांक मुळ प्रमाणपत्रावरुन प्रमाणित केलेले नाहीत.

२.नविन कर्मचारी रुजु झाल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी जिल्हा शल्य चिकीस्तक यांचेकडून करणे आवश्यक आहे. परंतु महाविद्यालयाने कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी काही प्रकरणात केलेली नाही.

४.कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी क्रमांक सेवा पुस्तकात नोंदविलेले नाहीत. व काही कर्मचा-यांचे विहीत नमुण्यात नामनिर्देशन घेतलेले नाही.

५ अर्जित रजा/अर्धवेतन रजा लेखा सेवा पुस्तकात वेळोवेळी अद्यावत केलेला नाही.

७.महाविद्यालयाने काही शिक्षकेत्तर कर्मचा-यांना महाराष्ट्र दर्शनाची सवलत दिलेली आहे. परंतु याची नोंद सेवा पुस्तकात घेतलेली नाही.

८.शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची जात वैधता केल्याची नोंद घ्यावी.

**परि.क्रं.४ :- दरपत्रकाशिवाय खरेदी :-**

शासन निर्णय उद्योग व उर्जा विभाग मंत्रालय,मुंबई क्रमांक /१०८८/२५१२/उद्योग-६ दिनांक ०२.०१.१९९२ व १६.०७.१९९३ नुसार रुपये १०००/- वरील खरेदी दरपत्रका नुसार तुलनात्मक रित्या निम्नदराने करणे आवश्यक आहे. परंतु महाविद्यालयाने खालील वस्तु दरपत्रकाशिवाय खरेदी केलेल्या आहेत.

महाविद्यालय स्तरावर खरेदीसाठी विहीत खरेदी समीती स्थापन केलेली नाही.

| अ. क्र. | प्र. क्र | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १६१ | १७.७.२०१४ | ११००० | बोर |
| २ | ३९३ | ०१.१२.२०१५ | ४०५०० | ईलेक्ट्रीकल पोल शिफटींग |
| ३ | ५४४ | ३.२.२०१६ | २८९८० | दरवाजे खर्च |
| ४ | ३७७ | ९.११.२०१५ | ४५००० | फर्निचर खर्च |
| ५ | २७३ | २०.९.२०१६ | २४२०० | फर्निचर खर्च |
| ६ | १७८ | १०.०८.२०१६ | ३९००० | ग्रंथालय फर्निचर खर्च |
| ७ | ११३ | ४.७.२०१६ | ३२५०० | फर्निचर रिपेअर खर्च |
| ८ | ६६ | १३.६.२०१६ | ४८८७५ | झेरॉक्स मशिन रिपेअर खर्च |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | २०५ | ११.९.२०१७ | ४५३५० | सी.सी.टी.व्ही.खर्च |
| १० | १३८ | २९.७.२०१७ | ३४८७९ | प्रिटींग खर्च |
| ११ | २०० | ११.७.२०१७ | ३१७७९ | स्टेशनरी खर्च |
| १२ | २९९ | २४.९.२०१८ | ४४३५० | स्टेशनरी खर्च |
| १३ | ३९६ | २६.११.२०१९ | ३८१५० | खुर्च्या खरेदी |
| १४ | २२९ | २३.८.२०१९ | ४८०४९ | झेरॉक्स मशिन रिपेअर खर्च |
| १५ | २९६ | २०.९.२०१९ | २५२०० | स्टेशनरी खर्च |
| | एकूण | | ५३७८१२/- | |

रु. ५३७८१२/- चा झालेला खर्च लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येतो. अनुपालन सादर करावे.

**परि क्र ५ :- विनानिविदा खरेदी :-**

| अ. क्र | खरेदी वर्ष | खरेदीचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | फर्निचर खरेदी | २७०००० |
| २ | २०१५-१६ | सी.सी.टी.व्ही .खरेदी | ५४९३० |
| ३ | २०१७-१८ | स्टेशनरी खरेदी | ६०७९६ |
| ४ | २०१८-१९ | खुर्ची खरेदी | ७४५०० |
| ५ | २०१८-१९ | स्टेशनरी खरेदी | ५०५२३ |
| ६ | २०१९-२० | कॅमेरा खरेदी | १६३९५० |
| | एकूण | | ६७४६९९/- |

महाविद्यालयाने वरील प्रमाणे दरपत्रके व निविदा यांचे शिवाय खरेदी केल्याने तुलनात्मक निम्नदराचा फायदा झालेला नाही. करीता वरील रक्कमेची खरेदी आक्षेपाधिन आहे.

**परि क्र ६:- प्रमाणकाशिवाय खरेदी :-**

लेखा परिक्षणास असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयाने खालील प्रमाणे खरेदी केलेली आहे. खरेदीचे प्रमाणके लेखा परीक्षणास पाहावयास मिळालेले नाही.

| **अ. क.** | **प्रमाण क्र** | **दिनांक** | **रक्कम** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| १ | ३६० | १५.१०.२०१९ | ३३६०० | गार्डन खर्च |
| | एकूण | | ३३६००/- | |

रुपये ३३६००/- सदर खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येतो.

**परि.क्रं. ७ - विविध वस्तु खरेदी व देयक रोख रक्कमेत अदाई बाबत. -------**

महाविद्यालयाने उक्त लेखा परिक्षण कालावधीत खरेदी केलेल्या वस्तु त्या खरेदी केल्यानंतर त्याची नोंद साठा/जड संग्रह नोंदवहीत घेतलेली नाही व रुपये ५००/- च्या वरील देयकाची अदाई रोख रक्कमेत केलेली

आहे.रुपये ५००/- च्या वरील खरेदी रक्कमेची अदाई धनादेशाव्दारे करवयास पाहीजे परंतु महाविद्यालयाने यानुसार कार्यवाही न करता रोख रक्कमेत अदाई केलेली आहे. खुलासा व्हावा, तसेच काही छपाई नियमानुसार केलेली नाही. त्यामुळे सदरील रक्कम लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येते.

| अ. क्र | प्रमाणक क्र | दिंनाक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ३९२ | ०१.१२.२०१५ | ३०८०० | रेती खरेदी |
| २ | ६१३ | १८.२.२०१५ | १०००० | पाणी टँकर |
| | | एकूण | ४०८००/- | |

रुपये ४०८००/- सदर खर्च लेखा परिक्षणात आक्षेपाधिना ठेवण्यात येते.

**परि क्रं.८ :- विविध वस्तु /फर्निचर /लेखन साहीत्य व पुस्तके व इतर साहित्य खरेदी बाबत.**

महाविद्यालयाने या कालावधीत विविध वस्तु फर्निचर व इतर लेखन साहित्य इ. खरेदी केलेली आहे.यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाविद्यालयात खरेदी केलेले वाचनालयातील पुस्तके व जड संग्रह वस्तु यांची प्रत्यक्ष तपासणी प्रतीवर्ष ३० जुन रोजी करुन तसे प्रमाणपत्र प्राचार्य यांनी नोंदवहीत नोंदवयास पाहीजे. लेखा परिक्षणात केलेल्या मार्गदर्शनानूसार कार्यवाही करुन पुर्तता लेखा परिक्षणास सादर करावी.

२.आयकर नियम १९२ ते १९६ नुसार खरेदी केलेल्या वस्तु/सेवा यावरील देयकातुन TDS रुपात विहीत दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे.परंतु उक्त लेखा परीक्षण कालावधीत महाविद्यालयाने खरेदी केलेल्या वस्तुंवर आयकर वसुल करुन शासन खाती भरलेला नाही ,खुलासा व्हावा व आयकर वसुल करुन शासन खाती भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

३.महाविद्यालयाने रोख रक्कम /भाडांर / वाचनालय सांभाळणा-या कर्मचा-याकडुन महाराष्ट्र वित्तीय नियमावली नियम ५१ नुसार बंधपत्र घ्यावयास पाहिजे व ते दरवर्षी प्रमाणित करुन घ्यावयास पाहिजे ,महाविद्यालयाने या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही, उक्त नियमानुसार कार्यवाही करुन पुर्तता लेखा परिक्षणास सादर करावी.

**परि क्रं. ९ :- शासन निर्णय उद्योग व ऊर्जा दिनांक २४ ऑगस्ट २०१७ नुसार GEM PORTAL वर खरेदी करणे बंधाकारक केलेले आहे. त्यानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयांनी यापूढे सर्व प्रकारची खरेदी GEM PORTAL वर नोंदणीकृत संस्था व विक्रेत्याकडून खरेदी करावी.**

**परि.क्रं.१० :- नोदवहया न ठेवणे बाबत :-**

**महाविद्यालयाने खालील प्रमाणे नोंद - वहया अदयावत ठेवलेल्या नाहीत.त्या ठेवून पुर्तता दर्शवावी.**

१. विद्युत मिटर नोंदवही
२.वेतनवाढ नोंदवही
३.दुरध्वनी नोंदवही
४.वृत्तपत्र नोंदवही
५.अग्रिम नोंदवही
६.सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची नोंदवही
७.साठा नोंदवही
८.जड संग्रह नोदवही.

**महाविद्यालयाने लेखा परिक्षणाचे अनूपालन खालील नमून्यात अहवाल मिळाले पासून १ महिन्याचे आत सादर करावे.**

| अ. क्र | परि क्र. परीच्छेदाचा सारांश | महाविद्यालयाने दिलेले अनुपालन | व. ले. प. यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | | |

**:: सारांश ::**

१. महाविद्यालय स्तरावर शिल्लक वेतन अनुदान :- रु. ५५००८४२/- ( परि क्र ०१ )
१.वेतन अनुदान अमान्य रुपये :- रु. निरंक (परि क्र )
२.वेतनेत्तर अनुदान अमान्य :- रु. निरंक ( परि क्र. )
३.वेतनेत्तर अनुदान आक्षेपाधीन :- रु.१२८६९११/- ( परि क्र. ४,५]६व ७)

वरील प्रमाणे अमान्य रक्कम सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांनी पुढील अनुदानातून कपात करुन लेखा परिक्षणास पुर्तता दर्शवावी.

(स्वाक्षरी) २४.५.२१

**वरीष्ठ लेखा परीक्षक तथा लेखाधिकारी**
**उच्च शिक्षण अनुदान,**
**औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.**

Principal
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya
Ashti, Tal. Ashti, Dist. Beed